| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| CNR-MHPA100004442024 | खटला दाखल दिनांक | : | १२/०७/२०२४ | | |
| | खटला नोंदणी दिनांक | : | १२/०७/२०२४ | | |
| | खटला निकाल दिनांक | : | ०४/०५/२०२६ | | |
| | निकाल कालावधी | : | वर्ष | महिना | दिवस |
| | | | ०१ | ०९ | २२ |

# अतिरिक्त सत्र न्यायाधीश गंगाखेड यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी डी. डी. कुरुलकर, अतिरिक्त सत्र न्यायाधीश गंगाखेड )**

सत्र खटला क्रमांक २७/२०२४ निशाणी क्रमांक

| | | |
|---|---|---|
| **सरकार पक्ष/ फिर्यादी** | : | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत : गंगाखेड पोलीस स्टेशन. |
| सादरकर्ते | : | सहायक सरकारी अभियोक्ता, श्री एस.बी. पौळ |
| | **विरुध्द** | |
| **आरोपी** | **१.** | **सुग्रीव वैजनाथ घुगे,**<br>वय – ३२ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. कासारवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी. |
| | **२.** | **रामकृष्ण यादवराव मोटे,**<br>वय – ४२ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. अकोली, गंगाखेड, ता.गंगाखेड. जि. परभणी.<br>ह.मु. सारडा कॉलनी, गंगाखेड. |
| सादरकर्ते | : | श्री. एच.जे.फड वकील, आरोपी क्र.१ तर्फे<br>श्री. जी.आर.पौळ वकील, आरोपी क्र.२ तर्फे |

**दोषारोप –** कलम ३२८, २७२, २७३ सहकलम ३४ भारतीय दंड विधान आणि कलम २७(३)(डी) सहकलम ५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६.

---

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | १२/०७/२०२३ |
| फिर्याद दाखल तारीख | : | १२/०७/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | ०३/११/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | : | ०६/०१/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | २०/०३/२०२६ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | : | ०४/०५/२०२६ |
| निकालाची तारीख | : | ०४/०५/२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेलतर. | : | -- |

| आरोपीचा अनुक्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्र.संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरोपी क्र.१. | सुग्रीव वैजनाथ घुगे | १२/०७/२०२३ | २०/०७/२०२३ | कलम ३२८, २७२, २७३, सह कलम ३४ भा.दं.वि आणि कलम २७(३)(डी) सहकलम ५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा | निर्दोष | -- | -- |
| आरोपी क्र.२. | रामकृष्ण यादवराव मोटे | ---//--- | ---//--- | ---//--- | निर्दोष | -- | -- |

## अ सरकारपक्षाचे साक्षीदार

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | संतोष ज्ञानोबा दहिफळे | जप्ती पंच |
| सा.क्र.२ | शिवप्रसाद धोंडीबा मुरकुटे | जप्ती पंच |
| सा.क्र.३ | दत्ता तुकाराम पवार | घटनास्थळ पंच |
| सा.क्र.४ | भगवान सोपान मुंढे | घटनास्थळ पंच |
| सा.क्र.५ | सेवानिवृत्त पो.उप नि. शरद सुधाकरराव सावंत | तपास अधिकारी |
| सा.क्र.६ | पो. कॉ./११५६ परसराम धोंडीबा गायकवाड | फिर्यादी |

## ब– बचाव पक्षाचे साक्षीदार

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| बचावपक्षाचे सा.क्र.१ | तपासले नाही | –– |

## क– न्यायालयाचे साक्षीदार

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| कोर्ट सा.क्र.१ | तपासले नाही | –– |

## अ सरकारपक्षाचा कागदोपत्री पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निशाणी पी.१२/सा.क्र.१ | सुचनापत्र |
| ०२ | निशाणी पी.१३/सा.क्र.१ | जप्ती पंचनामा |
| ०३ | निशाणी पी.१६/सा.क्र.३ | घटनास्थळ पंचनामा |
| ०४ | निशाणी पी.१९/सा.क्र.५ | मुद्देमाल सी.ए. कामी पाठविलेले पत्र |
| ०५ | निशाणी पी.२०/सा.क्र.६ | फिर्याद |

## ब बचाव पक्षाचा कागदोपत्री पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | -- |

## क न्यायालयाचा कागदोपत्री पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | -- |

## ड मुद्देमाल/वस्तू

| अ.क्र | मुद्देमाल/वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(आज दिनांक ०४ मे, २०२६ रोजी अधिघोषीत )

१) आरोपी क्र.१ व २ यांच्याविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२८, २७२, २७३ सह कलम ३४ आणि कलम २७ (३)(डी) ५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अन्वये दोषारोपपत्र ठेवण्यात आले आहे.

## अभियोग पक्षाची थोडक्यात केस अशी आहे की,

२) फिर्यादी परसराम धोंडीबा गायकवाड, पोलीस शिपाई/११५६, स्था.गु. शाखा, परभणी यांनी पोलीस ठाण्यात अशी फिर्याद दिली की, दिनांक १२/०७/२०२३ रोजी, मा. पोलीस अधिक्षक यांच्या आदेशान्वये व पोलीस निरीक्षक

यांचे मार्गदर्शनाखाली फिर्यादी, पोलीस उपनिरीक्षक मारोती चव्हाण, पोलीस हवालदार/१२६९ परसोडे, पोलीस हवालदार/२७७ निकाळजे, पोलीस शिपाई/१६८८ रफीयोद्दीन शेख गंगाखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम डिस्कव्हर मोटार सायकल क्र. एम.एच.–२२–ए.एम–९५११ च्या मागील हुकला पिशवी अडकवुन त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या अवैध गुटखा घेऊन ढवळकेवाडी ते कासारवाडी रोडजवळील कॅनालजवळ पुलावर, ढवळकेवाडी शिवार येथे येणार आहे. मिळालेल्या माहितीवरुन पोलीस हवालदार/१२६९ परसोडे यांनी दोन पंचांना बोलावुन घेतले व पंचांना रेडबाबत माहिती कळवुन कॅनलजवळील पुलावर सापळा लावुन थांबले. त्यावेळी अंदाजे ०९.०० वाजताचे सुमारास एक इसम वर नमुद वर्णनाच्या गाडीवर कॅनॉलच्या दिशेने येत असताना दिसला. त्यांनी त्यास हात करुन थांबण्याचा इशारा केला. फिर्यादीने आरोपीस त्यांची व पंचांची ओळख करुन दिली व आरोपीस त्याचे नाव व गांव विचारले असता, त्याने त्याचे नाव सुग्रीव वैजनाथ घुगे, रा. कासारवाडी, ता. गंगाखेड असे सांगितले. आरोपीस झडतीचा उद्देश कळवुन मोटारसायकलला अडकलेल्या पिशवीची झडती घेतली असता, त्यामध्ये त्यांना राजनिवास सुगंधित पान मसाला, प्रिमियम झेड एल – ०१ जाफरानी जर्दा, केसरयुक्त विमल पानमसाला, व्ही–१ तंबाखु, केसरयुक्त गोवा व गुन्ह्यातील मोटारसायकल एकुण किंमत रु. ३९,१८०/– चा ऐवज मिळुन आला. पोलीस हवालदार परसोडे यांनी पंचांसमक्ष जप्त मुद्देमाल जागीच सील करुन त्यावर त्यांचे व पंचांच्या सहीचे चिठ्ठ्या

लावुन जप्त केला. आरोपीस वरील वर्णनाचा मुद्देमाल कोणाकडुन खरेदी केला असे विचारले असता, त्याने राम मोटे, रा. अकोली, ता. गंगाखेड याचेकडुन खरेदी केला असल्याचे सांगितले. तसेच फिर्यादी यांनी आरोपीच्या विरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

३) त्यावरून आरोपींच्या विरुद्ध गु.र. क्रमांक २९७/२०२३ अन्वये वरील कलमां अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला. सदरहू गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक एस.एस.सावंत यांच्याकडे वर्ग करण्यात आला. त्यांना तपासात फिर्याद, जप्ती पंचनामा असे कागदपत्र तसेच मुद्देमाल व आरोपी देण्यात आले. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाला भेट देउन घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. आरोपींना पंचनाम्यान्वये अटक केली. जप्त नमुना तपासणीसाठी न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेकडे पाठविला. तपासाअंती आरोपींच्या विरुद्ध पुरावा मिळून आल्याने वरील कलमांतर्गत दोषारोपपत्र दाखल केले.

४) प्रस्तुतचा खटला भारतीय दंड विधान कलम ३२८ नुसार असल्यामुळे, चालविण्याचे अधिकार सत्र न्यायालयास असल्यामुळे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.१, गंगाखेड यांनी सदरचे प्रकरण चालविण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता २०७ अन्वये पुर्तता करुन या न्यायालयाकडे वर्ग केले.

५) आरोपींच्या विरुध्द निशाणी क्रमांक ८ प्रमाणे, भारतीय दंड विधानाचे कलम ३२८, २७२, २७३, सहकलम ३४ व कलम २७ (३)(डी) सहकलम ५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अन्वये दोषारोप ठेवले. तो दोषारोप आरोपींना समजावुन सांगण्यात आला. आरोपींनी तो दोषारोप नाकबुल केला व खटला चालविण्याची विनंती केली. आरोपींचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे जवाब नि.क्र. २३ व २४ प्रमाणे नोंदविण्यात आला. आरोपींनी या प्रकरणात असा बचाव घेतला की, त्यांना या केसमध्ये खोट्या रितीने गोवण्यात आलेले आहे.

६) सरकार पक्षाचे प्रकरण व आरोपीचाबचाव पाहता खालीलप्रमाणे मुद्दे हे माझ्यासमोर विचाराधीन असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक १२/०७/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजताचे दरम्यान ढवळकेवाडी ते कासारवाडी पुल, ता. गंगाखेड, जि. परभणी येथे आरोपींनी त्यांच्या सामाईक उद्देशाने ताब्यात गुटखा व पान मसाला जो महाराष्ट्र शासनाने बंदी असलेल्या अन्नपदार्थ जे की विक्रीच्या उद्देशाने बाळगला ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात लोकांना विष किंवा मुर्च्छीत करणारी वस्तू किंवा लोकांना दुखापत करण्याच्या उद्देशाने होती आणि त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम ३२८ सहकलम ३४ अंतर्गत दंडनीय गुन्हा केला होता? | ..... नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी त्यांच्या सामाईक उद्देशाने त्यांच्या ताब्यात प्रतिबंधित गुटखा व पान मसाला जो महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या अन्नपदार्थचा साठा आढळला होता, जेणेकरून ते अन्न म्हणून हानिकारक बनवता येईल आणि अशा वस्तू अन्न म्हणून विकता येतील आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेच्या कलम २७२ सहकलम ३४ अंतर्गत दंडनीय गुन्हा केला काय? | . .... नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी त्यांच्या ताब्यात गुटखा व पान मसाला जो महाराष्ट्र शासनाने बंदी असलेल्या अन्नपदार्थ विक्रीसाठी ऑफर केलेला किंवा विक्रीसाठी उघड केलेला खाद्य पदार्थ हानिकारक बनला होता, तो हानिकारक आहे हे जाणून किंवा असे मानण्याचे कारण असतांना देखील तो विक्रीसाठी ठेवला आणि त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम २७३ सहकलम ३४ अंतर्गत दंडनीय गुन्हा केला ? | ..... नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी आरोपींकडे बंदी घातलेल्या गुटखा व पानमसाला अन्नपदार्थांचा साठा आढळला जो विक्रीसाठी साठवला गेला होता, जे उत्पादक किंवा वितरकांना ओळखता येत नाही त्यांच्याकडून असे अन्नपदार्थ मिळाले होते, जे की अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ च्या कलम २७(३)(ड) चे उल्लंघन करून त्याद्वारे सदर कायद्याच्या कलम ५९ अंतर्गत दंडनीय गुन्हा केला काय? | ..... नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार. |

## कारण मिमांसा

**७) मुद्दे क्रमांक – १ ते ५**

अभियोग पक्षातर्फे जप्ती पंचनाम्यावरील पंच संतोष दहिफळे सा.क्र.१ व शिवप्रसाद मुरकुटे सा.क्र.२ यांना अनुक्रमे निशाणी क्र.११ आणि १४ ला तपासण्यात आलेले आहे. दोन्ही साक्षीदारांनी त्यांची जप्ती पंचनाम्यावरील सही मान्य केली आहे. परंतू, त्यातील मजकुराची त्यांना माहिती नाही असे सांगितले आहे. त्यामुळे दोन्ही साक्षीदारांना फितुर घोषित करुन त्यांचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये सुध्दा अभियोग पक्षाला आरोपींच्या ताब्यातुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा जप्त केला, त्याचा पंचनामा केला ही बाब सिध्द करता आली नाही. त्यामुळे वरील दोन्ही साक्षीदारांचा पुरावा हा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

८) अभियोग पक्षातर्फे जप्ती पंचनाम्यावरील पंच दत्ता पवार सा.क्र.३ व भगवान मुंढे सा.क्र.४ यांना अनुक्रमे निशाणी क्र.१५ आणि १७ ला तपासण्यात आलेले आहे. दोन्ही साक्षीदारांनी त्यांची घटनास्थळ पंचनाम्यावरील सही मान्य केली आहे. परंतू, त्यातील मजकुराची त्यांना माहिती नाही असे सांगितले आहे. त्यामुळे दोन्ही साक्षीदारांना फितुर घोषित करुन त्यांचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये सुध्दा अभियोग पक्षाला घटनास्थळ पंचनामा या साक्षीदारांच्या समक्ष करण्यात आला ही बाब

सिध्द करता आली नाही. त्यामुळे वरील दोन्ही साक्षीदारांचा पुरावा हा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

९) साक्षीदार क्र.५ तपास अधिकारी एस.एस.सावंत यांना निशाणी क्र.१८ वर तपासण्यात आले आहे. या साक्षीदाराने घटनास्थळाला भेट देऊन घटनास्थळ पंचनामा केला, मुद्देमाल पावती तयार केली, साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले, आरोपींना अटक करुन पंचनामा केला असे सांगितले आहे. तसेच त्यांनी जप्त मुद्देमालातील नमुना हा न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेकडे पत्र निशाणी पी.१९ सोबत पाठविला असे सांगितले आहे. उलटतपासामध्ये या साक्षीदाराने त्यांच्याकडे तपास देण्यापुर्वी मुद्देमाल कुठे ठेवला होता याची त्यांना माहिती नाही असे त्यांना सांगितले आहे.

१०) अभियोग पक्षाने फिर्यादी परसराम गायकवाड सा.क्र.५ यांना निशाणी क्र.२० ला तपासलेले आहे. या साक्षीदारामार्फत फिर्याद निशाणी पी.२१ सिध्द केलेली आहे. उलटतपासामध्ये या साक्षीदाराने ज्या पुलावर गुटखा पकडला त्याच्या जवळच रोडलगत हॉटेल आहे असे कबुल केले आहे. तपास अधिकारी यांनी स्वतंत्र अशा साक्षीदाराचा जबाब नोंदविला नाही. आरोपी क्र.२ याचा मुद्देमालाशी काय संबंध आहे व गुन्ह्यामध्ये त्याचा काय सहभाग आहे याबद्दल अभिलेखावर पुरावा आलेला नाही.

**११)** अभियोग पक्षातर्फे जो पुरावा देण्यात आला त्यावरून असे दिसते की आरोपी क्र.२ याला जागेवरती पकडण्यात आलेले नाही. अभियोग पक्षाच्या केस नुसार आरोपी क्र.१ याने आरोपी क्र.२ याचे नाव सांगितले त्यावरून त्याला या प्रकरणात समाविष्ट करण्यात आल्याचे दिसते. साक्षीदार क्र.५ व ६ यांची साक्ष ही आरोपीच्या ताब्यातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला अथवा तंबाखूजन्य पदार्थ आहेत हे दर्शवण्यासाठी न्याय वैद्यकीय प्रयोगशाळेचा अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे जरी साक्षीदार क्र.५ व ६ यांचा पुरावा विचारात घेतला तरीही निश्चितपणे अभियोग पक्षाला आरोपींच्या विरुद्ध ठेवण्यात आलेले दोषारोप हे संशयापलीकडे सिद्ध करता आले नाही हे स्पष्ट होते.

**१२)** तसेच मुद्देमाल तपासणीसाठी पाठवलेचे पत्र निशाणी पि–१९ वरती आहे. न्यायवैदयकीय प्रयोग शाळेचा अहवाल अभिलेखावरती दाखल केलेला नाही. त्यामुळे जो मुद्देमाल जप्त करण्यात आला तो शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा होता तसेच सदरहु जप्त मुद्देमाल हा मानवी जीवनास अपायकारक होता ही बाब अभियोग पक्षाला न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेच्या अहवाला अभावी सिध्द करता आलेली नाही.

**१३)** आरोपींनी मानवी आरोग्यास हानिकारक अथवा अपायकारक अशी कोणतीही वस्तू विकली किंवा प्रयत्न किंवा विकण्यासाठी ठेवली जी विषारी बनली आहे किंवा विकली गेली आहे हे दाखवणारा कोणताही ठोस पुरावा नाही. आरोपींविरुध्द

ठेवण्यात आलेल्या दोषारोपांपैकी कोणताही गुन्हा सिध्द करण्यासाठी अभिलेखावरील पुरावा पुरेसा नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देतो व मुद्दा क्र.५ ला अनुसरुन खालील आदेश पारीत करतो.

**-::- आदेश -::-**

**१]** आरोपी क्र.१ व २ यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) नुसार भारतीय दंड विधानाचे कलम ३२८, २७२, २७३ सहकलम ३४ आणि कलम २७(३)(डी) सहकलम ५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या आरोपातुन निर्दोष सोडण्यात येते.

**२]** आरोपींचा जातमुचलका रद्द करण्यात येतो.

**३]** प्रत्येक आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ प्रमाणे या निकालाविरुध्द अपिल किंवा प्रकरणाशी संबधी वरिष्ठ न्यायालयाची नोटीस आल्यानंतर तेथे हजर राहण्यासाठी प्रत्येकी रू.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व त्याच रकमेची ऐपत असलेला जामीनदार द्यावा.

**४]** जर मुद्देमाल नष्ट केला नसल्यास कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करुन सक्षम अधिकारी यांच्याकडे मुद्देमाल हा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे पुढील योग्य त्या कारवाईस्तव पाठवण्यात यावा.

**५]** जप्त करण्यात आलेले वाहन हे अंतरिम आदेशाप्रमाणे नोंदणीकृत मुळ मालकास परत केलेले आहे. सदर आदेश हा कायम करण्यात येतो

**६]** निकाल खुल्या न्यायालयात सांगीतला व घोषीत केला.

DINESH DATTATRAYA KURULKAR

Digitally signed by DINESH DATTATRAYA KURULKAR
Date: 2026.05.04 17:25:01 +0530

**(डी.डी. कुरुलकर)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, गंगाखेड.**

**दिनांक ०४/०५/२०२६**